

11:29
69%
REC
Janaki Kurtadikar
Dr Shahaji Gaikwad
Dr. Vidya Diwate
Dr Deore sujata kashinathrao


Dr Deore sujata kashinathr...
Madan Nagre
Madan Nagre
Dr. Sushama Pradhan
Bhausaheb Patil Andhale
Harshada Gaikwad
Dr. Vidya Diwate
D R Wahule
Poonam salve
Surase
Manisha Gaikwad
Janaki Kurtadikar
Kalyan Ekhandde
Rajnandini dorkhe
Disha
Komal Matkar
Geeta Bodkhe
shrimant laxma...
Rohini kakde
Mayuri Gaikwad
Sonal patekar
Geeta Bodkhe
shrimant laxman shinde
Rohini kakde
Mayuri Gaikwad

11:04 80%

Close

# Participants (81)

- DS Dr Shahaji Gaikwad
- DR Dr. Ram Raunekar
- DR Dr. Ravindra Pathre
- DS Dr. Sushama Pradhan
- DV Dr. Vidya Diwate
- DM Dr.Shakuntala Mhaske
- FS farhana siddiqui
- GR Gaikwad Rohini
- GB Geeta Bodkhe
- HG Harshada Gaikwad
- KT Kalpana Tekale
- KE Kalyan Ekhandde

**Invite**

MSS'S Arts Science and Commerce college Ambad. Dist. Jalna-431204
Reaccredited 'A' Level by NAAC

# *Online International World Women's Day-2022*

Jointly Organised by Vishakha Committee, MSS's
Arts, Science and Commerce College, Ambad.

***8th March 2022***

***(10:30am -11:30am)***

**Chairperson**
Prof. Dr. Shahaji V. Gaikwad
Principal

**Speaker**
Dr. Sujata Devare
Ankushrao Tope College.
Jalna

**IQAC Coordinator**
Dr. R. F. Pathre
Head of Zoology Department

**Organising Committee**

J. W. Kurtadikar M. N. Gaikwad Dr. V. J. Bhillare Dr. S. U. Mhaske A. S. Chitra

https://us05web.zoom.us/j/88316796036?pwd=VW1NS0ZwaGxtS0tYVW0vSDhaMitDZz09

Online Zoom link will be provided on WhatsApp soon.

# ऑनलाइन आंतरराष्ट्रीय महिला दिन

**8 मार्च 2022**

कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय आणि विशाखा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक आठ मार्च 2022 रोजी सकाळी 10.30 -11.45 या वेळेत ऑनलाइनच्या माध्यमातून साजरा करण्यात आला

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉक्टर शहाजी राव गायकवाड हे होते तसेच आजच्या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या अंकुशराव टोपे महाविद्यालयातील मानसशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका डॉक्टर सुजाता देवरे यांना आमंत्रित करण्यात आले. डॉक्टर देवरे यांनी स्त्री पुरुष समानता या विषयावर विस्तृत असे मार्गदर्शन केले तसेच स्त्रियांनी स्वतःच्या क्षमता ओळखून आपली प्रगती आणि ध्येय साध्य .केले पाहिजे ,स्त्रियांनी आत्मनिर्भर आणि सक्षम परिस्थितीनुरूप बनलेच पाहिजेअसे प्रतिपादन केले. तसेच स्त्रियांना कायद्याने मिळालेल्या अधिकारांचा योग्य असा वापर केला पाहिजे, शैक्षणिक दृष्ट्या सक्षम बनले पाहिजे आणि प्रत्येक स्त्रीने दुसऱ्या स्त्रीला यासाठी प्रोत्साहन दिलेच पाहिजे असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसरडॉ. गायकवाड सर म्हणाले की आजच्या काळात स्त्रियांची झालेली प्रगती, आज वरचा तिचा प्रवास निश्चितच अभिनंदनीय आणि अभिमानास्पद आहे यात शंका नाही. प्राचीन काळापासून स्त्रियांनी समाजात आदर्श डोळ्यासमोर ठेवला आहे जसे सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, राजमाता जिजाऊ आणि अलिकडच्या काळापर्यंत अनेक क्षेत्रात स्त्रियांनी समाजापुढे, देशापुढे आदर्श घडवला आहे. त्यामुळे 8 मार्च हा दिवस निश्चितच सर्वांसाठी सर्व स्त्रियांसाठी एक प्रतिकात्मक रुपाने जागतिक स्तरावर साजरा केला जातो आजच्या दिवशी

# विशाखा समिति

## जनजागृती अभियान आणि मार्गदर्शन शिबिर 11 नोव्हेंबर 2021

आजादी अमृत महोत्सव या उपक्रमा अंतर्गत, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई आणि कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय अंबड तसेच विशाखा समिती अंतर्गत जनजागृती अभियान आणि मार्गदर्शन शिबिर 11 नोव्हेंबर 2021 रोजी सकाळी 11.00 वाजता संपन्न झाले.

या कार्यक्रमासाठी जिल्हा विधी सेवा प्रतिष्ठान ,तालुका विधी सेवा समिती, जिल्हा आणि अंबड न्यायालय यांच्यामार्फत प्रमुख मार्गदर्शिका म्हणून न्यायाधीश श्रीमती चौधरी या लाभल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉक्टर शिव शंकर घुमरे हे होते. तसेच एडवोकेट श्रीमती आशा गाडेकर मॅडम यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक डॉक्टर विनोद जाधव यांनी केले.

या कार्यक्रमाअंतर्गत न्यायाधीश श्रीमती चौधरी मॅडम यांनी स्त्रियांसाठी कायद्यांमध्ये तरतूद असलेले कलम आणि नियमांची माहिती दिली, तसेच महाविद्यालयीन मुलींच्या ॲसिड हल्ला आणि छेडछाड कायद्याअंतर्गत कलम ,नियमांची ,उपाययोजनांची माहिती देण्यात आली. यानंतर श्रीमती आशा गाडेकर मॅडम यांनी महाविद्यालयीन तरुणींवर होणारे ऍसिड हल्ले तसेच छेडछाडीच्या घटना यासाठी असलेल्या कायद्याच्या तरतुदी आणि उपाययोजना यावर सविस्तर माहिती दिली जेणेकरून महाविद्यालयीन तरुण मुलींमध्ये जनजागृती होऊन अशा प्रसंगाला तोंड देण्याचे धैर्य त्यांच्यामध्ये यावे.

याप्रसंगी एडवोकेट देशमुख सर, एडवोकेट गीतांजली मॅडम यांनीही मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य घुमरे म्हणाले की, आजच्या काळात महिलांनी अशा घटनांकडे बघताना घाबरून जाऊ नये , तसेच कायद्या मधले असलेल्या तरतुदींचा आणि उपाययोजनांचा उपयोग योग्यवेळी आणि निर्भीडपणे करणे, कुठलाही अन्याय सहन न करणे ही आजच्या काळाची गरज आहे. स्त्री सक्षमीकरणासाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमांमधून जनजागृती करणे, त्यांना मार्गदर्शन करणे ही आजच्या काळाची गरज आहे.

या कार्यक्रमासाठी विशाखा समितीच्या प्रमुख प्रा. जानकी कुर्तडीकर, प्रा. मनीषा गायकवाड, प्रा. शकुंतला मस्के तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनींची उपस्थिती लक्षणीय होती.

याप्रसंगी सदरील संस्थेतर्फे महिला जनजागृती साठी परिपत्रके देखील वाटण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. जानकी कुर्तडीकर.यांनी केले


महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई
जनजागृती अभियान/मार्गदर्शन शिबीर
कालावधी २ ऑक्टोबर २०२१ ते १४ नोव्हेंबर २०२१





विशाखा समिती 2021 - 2022

भारतीय जैन संघटना व अंकुशराव टोपे महाविद्यालय समुपदेशन केंद्र अंतर्गत मत्स्योदरी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अंबड जिल्हा जालना यांच्या सहयोगाने मुलीचे सक्षमीकरण 'स्मार्ट गर्ल्स' कार्यशाळा दिनांक 05/10/2021 ते 10/10/2021 या कालावधीत ऑनलाइन संपन्न झाली.

या कार्यशाळेत मुलीच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने खालील विषय चर्चेसाठी ठेवण्यात आले.

1. स्व जागृतता
2. आत्मसन्मान
3. संवाद आणि नाते
4. मित्रता आणि प्रलोभन
5. चयन आणि निर्णय
6. पालकांसोबत संवाद

दिनांक 5 ऑक्टोबर पासून भारतीय जैन संघटना महाराष्ट्र राज्य द्वारा आयोजित 'स्मार्ट गर्ल्स' कार्यशाळेसाठी डॉक्टर मृदुला जैन यांनी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले. अंबड महाविद्यालयातील बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., च्या 250 विद्यार्थिनींनी या कार्यशाळेत सहभाग नोंदविला.

पहिल्या दिवशी 5 ऑक्टोबर कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. त्यानंतर स्व जागृतता या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चेत विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्वतःवर विश्वास ठेवावा. आपले चांगले गुण वाढवावे. तसेच आपण स्वतः स्वतःचा परिचय केला तर इतरांना ओळखणे अवघड जात नाही. प्रत्येकाने आधी स्वतःला ओळखणे गरजेचे आहे अशी शिकवण या शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थिनींना मिळाली.

दिनांक 6 ऑक्टोबर रोजी 'आत्मसन्मान' या विषयावर चर्चा करण्यात आली. प्रशिक्षक डॉ. मृदुला जैन यांनी अनेक उदाहरणाच्या सहाय्याने आपण आपल्या क्षमता कशा ओळखाव्यात हे समजावून सांगितले. तसेच आपण इतरांपेक्षा कमी आहोत हे पाहण्यापेक्षा आपल्यातील सक्षम गुणांकडे लक्ष केंद्रित

Received

केले पाहिजे व ते विकसित करण्याचा प्रयत्न कसा करावा अशी महत्त्वाची शिकवण कार्यशाळेत मिळाली. प्रत्येक विद्यार्थिनींनी आपल्या क्षमता ओळखून स्वतःच्या आत्मसन्मानाचे संवर्धन करण्याचा प्रयत्न केल्यास आपल्यात आत्मविश्वास वृद्धिंगत होतो अशी मोलाची शिकवण या कार्यशाळेत विद्यार्थिनींनी आत्मसात केली.

दिनांक 7 ऑक्टोबर रोजी स्व-संरक्षणाबद्दल चर्चा करण्यात आली. विद्यार्थिनींनी स्व-संरक्षणाबद्दल जागरुक असले पाहिजे. ते कशा प्रकारे करावे. आपल्याला वाटणाऱ्या भीतीवर मात कशी करावी हे सांगितले गेले. स्वसंरक्षणाचा हेतू स्वतःचे रक्षण स्वतः करणे हा असून अडचणीच्या, संकटाच्या काळात खचून न जाता आत्मविश्वासाने स्वतःचे संरक्षण स्वतः करून धैर्याने सामोरे जाऊन त्यातून बाहेर पडणे. तसेच अशा प्रसंगातून आपले शारीरिक, मानसिक स्वास्थ्य टिकून ठेवणे इत्यादी बाबतीत सविस्तर मार्गदर्शन केले. 'निर्भय राहू, आत्मरक्षा करू' हा महत्त्वाचा मंत्र डॉ. मधला जैन यांनी दिला.

दिनांक ८ ऑक्टोबर रोजी 'संवाद आणि नाते' या विषयावर चर्चा करण्यात आली. यामध्ये संवादाचे विविध प्रकार सांगितले. संवाद आणि नाते यांचा परस्पर कसा संबंध आहे हे उदाहरणासह सांगितले गेले. पाल्याकडून चूक झाल्यास ते आई-वडिलांना किंवा मोठ्यांना कशा पद्धतीने सांगितले जावे आणि त्यातून परत ती चूक होऊ नये. परिवारातील इतर सदस्यांमध्ये सुसंवाद झाल्यास एकोपा निर्माण होतो. एकमेकांबद्दल विश्वास वाढतो आणि नातेसंबंध दृढ होतात आणि घरातील वातावरणात भावनिकता निर्माण होते. यामुळे नात्यांची वीण घट्ट होते पालकांनी सुसंवादातून आपल्या मुलाच्या चुका दूर कराव्यात. 'स्वास्थ्य संवाद, स्वास्थ्य नातं' अशी महत्त्वाची शिकवण त्यांनी दिली.

दिनांक ९ ऑक्टोबर या दिवशी 'मित्रता व प्रलोभन' या विषयावर चर्चा झाली. त्यामध्ये मैत्री म्हणजे काय? चांगले मित्र-मैत्रिणी म्हणजे काय? चांगल्या मित्र-मैत्रिणी ची लक्षणे कोणती? चांगले मित्र मैत्रिणी कसे ओळखावे? खरा मित्र कोण? याची पारख कशी करावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

वाईट प्रवृतीच्या मित्र-मैत्रिणी अशी मैत्री करू नये असा सल्ला त्यांनी दिला. तसेच प्रलोभानाविषयी माहिती उदाहरणासह सांगितली. कोणत्याही प्रकारच्या प्रलोभनांना बळी पडू नये असे त्यांनी प्रतिपादित केले. तसेच मैत्रीमध्ये मस्ती, स्वतःविषयी खबरदारी याची शिकवण त्यांनी दिली.

दिनांक 10 ऑक्टोबर रोजी 'निवड आणि निर्णय' याबद्दल चर्चा करण्यात आली. स्वतःची जबाबदारी व निर्णय घेणे याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. आपण जबाबदार झालो तर स्वतंत्रता मिळेल. आपण जबाबदार व्यक्ती आहोत असे आपण आपल्या वागणुकीतून आणि व्यवहारातून दाखवून देऊ शकतो. तसेच स्वतंत्र होऊन जबाबदारी मिळेल, जबाबदार राहू तर स्वतंत्रता मिळेल हा मंत्र देण्यात आला.

सर्वात सर्वात शेवट सकाळी 11.30 वाजता या कार्यक्रमाचा ऑनलाईन समारोप करण्यात आला. या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री माननीय श्री राजेश भैय्या टोपे साहेब, राज्याध्यक्ष हस्तीमल बंब, राज्य प्रमुख EOG रामेश्वरजी ओस्वाल, राष्ट्रीय प्रमुख POG संजय सिंधी, तसेच BJS चे सर्व पदाधिकारी, प्रशिक्षक आणि कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील प्रा. एम. एन. गायकवाड, प्रा. जानकी कुर्तडीकर, प्रा. जे. एम. भालेराव, प्रा. एस. मस्के इत्यादी हजर होते. त्यानंतर दुपारी ३.०० वाजता डॉ. मृदुला जैन यांनी पालकांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी पालकांकडून पाच दिवस झालेल्या कार्यशाळेतील विषयानुरूप झालेल्या शिकवणुकीचा आढावा घेतला आणि विद्यार्थिनींनी आपले अनुभव कथन केले.

डॉ. एस. के. घुमरे

प्रा. एम. एन. गायकवाड

प्रा. जेड. ब्ल्यू. कुर्तडीकर

प्रा. जे. एम. भालेराव

प्रा. एस. मस्के

प्राचार्य

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

अंबड, जि. जालना ४३१२०४